# कृषि पणन विषयक बातम्या : डिसेंबर 2021

दै. "केसरी" दि. १४/१२/२०२१.

## ॲमेझॉनमार्फत राज्यात शेतमालाची खरेदी सुरू

**पुणे :** सातारा जिल्ह्यातील आसले, (ता.वाई) येथे ॲमेझॉनच्या नवीन फळ व भाजीपाला संकलन केंद्राचे उद्घाटन पणन उपसंचालक नितीन काळे यांच्या हस्ते झाले. यावेळी तालुका कृषी अधिकारी झेंडे, ॲमेझॉनचे प्रमुख राजेश प्रसाद, डॉ. शशीन शोभणे, ॲमेझॉनचे अध्यक्ष रवींद्र डोलारे, हे उपस्थित होते.

संकलन केंद्र स्थानिक फळ विशेषत: स्ट्रॉबेरी ब एक्झोटिक भाजीपाला पिकवणाऱ्या शेतकऱ्यांच्या उत्पादनांचे संकलन आणि वितरण करण्यासाठी स्थापन करण्यात आले. यामुळे शेतकऱ्यांना, ॲमेझॉन खरेदी प्लॅटफॉर्मवर आणून बाजारपेठेतील प्रवेश वाढणार आहे. या संकलन केंद्रात ॲमेझॉन इकोफ्रॉस्ट सोलर कोल्ड रूमचा वापर करून ग्राहकांपर्यंत उत्तम गुणवत्तेचा माल पोहचविण्यात येणार आहे. तसेच शेतमालाची होणारी नासाडी कमी होण्यास मदत होणार आहे. ॲमेझॉन फ्रेश इंडिया त्यांच्या शाश्वत उपक्रमातंर्गत सोलर कोल्ड रूमचा वापर करणार आहे.

ॲमेझॉन या कंपनीने राज्यात थेट शेतमाल खरेदी व विक्रीसाठी थेट परवाना घेतलेला आहे. थेट परवान्याअंतर्गत ॲमेझॉनने राज्यातील शेतमालाची खरेदीसाठी मंचर व नाशिक येथे यापूर्वी ०२ खरेदी केंद्र सुरू केली असून वाई येथे तिसऱ्या खरेदी केंद्राचे उद्घाटन केले आहे. या व्यतिरिक्त पुणे व मुंबई येथे शेतमाल व प्रक्रिया करण्यासाठी केंद्र उभारली असून सदर केंद्रांवरून संबंधित व जवळच्या शहरातील ग्राहकांना शेतमालाचा पुरवठा केला जातो.

राज्याचे पणन उपसंचालक नितीन काळे म्हणाले, या उपक्रमामुळे पंचक्रोशीतील शेतमालाला योग्य भाव मिळेल. ॲमेझॉन शेतकऱ्यांचा माल निर्यात करून अमेरिकेसारख्या इतर देशातील बाजारपेठ उपलब्ध करून देईल. तसेच स्ट्रॉबेरीची रोप ॲमेझॉनच्या संकलन केंद्रावर उपलब्ध करून द्यावीत, असे ही सांगितले. व्यवस्थापकीय संचालक सुनील पवार यांनी ॲमेझॉनने शेतकरी उत्पादक कंपन्यांसाठी विशेषत: आदिवासी भागातील शेतकऱ्यांसाठी एक बाजार पेठ उपलब्ध करून द्यावी, ही सूचना केली.

दै. "पुण्यनगरी" दि. १४।१२।२०२१.

# आता ॲमेझॉनमार्फत राज्यात शेतमालाची खरेदी सुरू

**। पुणे : प्रतिनिधी**

ॲमेझॉनमार्फत राज्यात शेतमालाची खरेदी सुरू करण्यात आली असून नुकतेच सातारा जिल्ह्यातील वाई तालुक्यातील आसले गावात ॲमेझॉनच्या नवीन फळ व भाजीपाला संकलन केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.

आसले येथील संकलन केंद्र स्थानिक फळ विशेषतः स्ट्रॉबेरी व एक्झोटिक भाजीपाला पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्या उत्पादनाचे संकलन आणि वितरण करण्यासाठी स्थापन करण्यात आले आहे. या संकलन केंद्रामुळे स्थानिक फळ व भाजीपाला उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना ॲमेझॉन खरेदी प्लॅटफॉर्मवर आणून त्यांचा बाजारपेठेतील प्रवेश वाढणार आहे. ॲमेझॉन फ्रेश इंडिया त्यांच्या शाश्वत उपक्रमांतर्गत सोलर कोल्ड रूमचा वापर करणार आहे. ॲमेझॉनने राज्यात थेट शेतमाल व विक्रीसाठी परवाना घेतला आहे. थेट परवान्याअंतर्गत ॲमेझॉनने राज्यातील शेतमालाच्या खरेदीसाठी मंचर व नाशिक येथे यापूर्वी दोन खरेदी केंद्रे सुरू केली आहेत. वाई येथे तिसऱ्या खरेदी केंद्राचे उद्घाटन पणन उपसंचालक नितीन काळे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी राजेश प्रसाद, डॉ. शशीन शोभणे, रवींद्र डोलारे आदी उपस्थित होते. दरम्यान, या उपक्रमाबाबत राज्याचे पणन संचालक सुनील पवार म्हणाले की, हा शेतकऱ्यांच्या हितासाठी स्तुत्य उपक्रम आहे. तसेच ॲमेझॉनने शेतकरी उत्पादक कंपन्यांसाठी विशेषतः आदिवासी भागातील शेतकऱ्यांसाठी एक बाजारपेठ उपलब्ध करून द्यावी, अशी सूचनाही पवार यांनी केली.

दै. "ॲग्रोवन" दि. १४/१२/२०२१.

# फुलांच्या मूल्यवर्धनासाठी 'पुष्पसंशोधन'सोबत काम

## पुणे बाजार समितीचे प्रशासक मधुकांत गरड यांची माहिती

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : "फुलांच्या मूल्यवर्धनासाठी त्यावर प्रक्रिया करून विविध उत्पादने निर्मितीसाठी पुणे बाजार समिती आणि पुष्पसंशोधन संचालनालय एकत्रित काम करणार आहे," अशी माहिती बाजार समितीचे प्रशासक मधुकांत गरड यांनी दिली.

संचालनालयाच्या १२ व्या वर्धापन दिनानिमित्त मांजरी येथील संशोधन प्रक्षेत्राला भेट देऊन गरड यांनी संचालनालयाचे संचालक डॉ. के. व्ही. प्रसाद यांची भेट घेऊन सविस्तर माहिती घेतली.

गरड म्हणाले," पुणे जिल्हा फुले उत्पादनासाठीचा क्लस्टर म्हणून विकसित होत आहे. शेतकऱ्यांचे नुकसान कमी करण्यासाठी पुष्पसंशोधन संचालनालयातर्फे विविध संशोधन प्रकल्प सुरु आहेत. हे संशोधन थेट बांधावर पोचविण्यासाठी शेतकरी आणि व्यापाऱ्यांमध्ये समन्वय साधण्यात येत आहे. यासाठी डॉ. प्रसाद यांचे मार्गदर्शन घेणार आहे."

"सध्या व्यापारीच फुलांचा प्रकार, वाण, रंग विक्रीसाठी निश्चित करतात. त्यामुळे शेतकऱ्यांना विशिष्ट जातीचीच फुले व विशिष्ट रंगाचीच फुले उत्पादित करावी लागतात. परिणामी फुलांच्या अनेक वाण आणि रंगांचे पर्याय असताना फुलांच्या उत्पादनावर शेतकऱ्यांना मर्यादा आहेत. व्यापाऱ्यांची आणि ग्राहकांची मानसिकता बदलणे आवश्यक आहे", असे प्रसाद यांनी सांगितले.



पुणे : पुष्पसंशोधन संचालनालयाच्या मांजरी येथील संशोधन प्रक्षेत्राला भेट देऊन चर्चा करताना मधुकांत गरड आणि डॉ. के.व्ही. प्रसाद.

> **पुष्पसंशोधन संचालनालयाने शेवंती आणि गुलछडीचे विविध वाण विकसित केली आहेत. आता पुणे, सातारा, नगर, सोलापूर, नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांना या केंद्रातून वाण उपलब्ध होतील. ही फुले बाजारात आल्यावर नक्कीच ग्राहकांना आवडतील आणि दर पण चांगले मिळतील.**
>
> **- अप्पा गायकवाड**, अध्यक्ष, फुले बाजार अडते व व्यापारी संघ.

दै. "अॅग्रोवन" दि. ९/१२/२०२१.

# बाजार समिती शेतीमालावर घेणार उपयोगिता शुल्क

## मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय; पणन कायद्यात करणार सुधारणा

**मुंबई** : राज्यातील बाजार समित्यांना अधिक बळकट करण्यासाठी महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय बुधवारी (ता. ८) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते.

यानुसार बाजार समितीवर संचालक निवडून देण्यासाठी ज्या बहुउद्देशीय सहकारी संस्था त्यांच्या सदस्यांना पीककर्ज वितरित करतात त्यांनाच मतदानाचा अधिकार देण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. बाजार समितीवर नियुक्त करावयाच्या अशासकीय प्रशासकीय मंडळाची संख्या ७ पेक्षा जास्त सदस्यांचे असणार नाही. बाजार समितीच्या आवारात नियमनात नसलेल्या शेतीमाल व अन्य उत्पादनाच्या खरेदी-विक्रीवर बाजार समितीला उपयोगिता शुल्क घेण्याचा हक्क असेल. बाजार समितीवर देखरेख शुल्क वसुलीसाठी बाजार समितीवर शासनाचा कर्मचारी नियुक्त करण्याची तरतूद वगळण्यात येईल व देखरेख फी '५ पैसे' ऐवजी '१० पैसे' अशी सुधारणा प्रस्तावित आहे.

पान ४ वर »

# बाजार समिती शेतीमालावर घेणार उपयोगिता शुल्क

» पान १ वरून

बाजार समितीवर सचिव नियुक्त करण्यासाठी सध्याची राज्य पणन मंडळाने सचिव म्हणून नियुक्त करावयाच्या व्यक्तींची यादी तयार करण्याबाबतची तरतूद वगळण्यात येईल. बाजार समितीवर सचिव म्हणून सहकार अधिकारी श्रेणी-२ यापेक्षा वरच्या दर्जाचा अधिकारी शासनाला नेमता येईल. राज्य कृषी पणन मंडळास त्यांना देय रकमेबाबत वाद उद्भवल्यास न्यायाधिकरणाकडे दाद मागता येईल, अशी सुधारणा करण्यात येईल.

दै. "पुढारी" दि. ७/१२/२०२१.

# राज्यातील शेतकरी होणार धनवान

## सरकार देणार कृषी माल निर्यातीचे धडे; मोठ्या शहरांमध्ये थेट विक्रीसही मुभा

**मुंबई : चंदन शिरवाळे**

राज्यातील शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी राज्य सरकारने त्यांना कृषी उत्पादन निर्यातीचे धडे देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्यासाठी ३५० कृषी अधिकाऱ्यांचे पुणे येथे प्रशिक्षण सुरू आहे. हे अधिकारी प्रशिक्षित झाल्यानंतर ते शेतकऱ्यांना निर्याती विषयी मार्गदर्शन करणार आहेत.

निर्यातक्षम शेतीमाल उत्पादन करणे, पॅकेजिंग आणि मार्केटिंग तसेच चांगल्या पद्धतीने शेती कसण्याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जाणार आहे. यासोबतच मुंबई, पुणे, नागपूर. आणि औरंगाबाद यांसारख्या मोठ्या शहरांमध्ये शेतकऱ्यांना थेट शेतमालाची विक्रीही करता येणार आहे.

राज्य कृषी पणन महामंडळामार्फत



राज्यातील फुले, भाजीपाला, फळे यांची जगभरात निर्यात केली जाते. याशिवाय या महामंडळाच्या सहकार्याने शेतकरीसुद्धा आंबा, द्राक्षे, डाळिंब, आंबा पल्प, काजू, संत्री, मका, तांदूळ यासह इतर धान्यांची निर्यात करत आहेत. त्यासाठी महामंडळाने राज्यात ४४ निर्यात केंद्र सुविधा उभारल्या आहेत. महामंडळाच्या माध्यमातून शेतकरी, शेतकरी गट, सहकारी संस्था यांना शेतमालाच्या निर्यातीसाठी मदत केली जाते.

यासंदर्भात कृषिमंत्री दादाजी भुसे म्हणाले, कृषी अधिकारी शेतकऱ्यांना चांगली शेती कसण्याविषयी माहिती देत आहेत. मात्र, आता शेतकऱ्यांना शेतीमाल उत्पादनासाठी प्रशिक्षणही देणार आहेत. जेणेकरून शेतकरी निर्यात करण्यास पात्र ठरतील.

महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी अहवालानुसार, २०१९-२० या वर्षात ३०७ कोटी रुपयांची आंबा निर्यात झाली. २०१८-१८ मध्ये ३१४ आणि २०१७-१८ मध्ये ३०९ कोटी रुपयांच्या आंब्याची निर्यात झाली होती.

२०१९-२० मध्ये २०१९ कोटी रुपयांची द्राक्षे परदेशात पाठवण्यात आली. तर २०१८-१९ मध्ये २११८ आणि २०१७-१८ मध्ये १८७१ कोटी रुपयांची द्राक्षे निर्यात झाली. २०१९-२० या वर्षात ४०८ कोटी रुपयांची डाळिंबे परदेशात पाठवण्यात आली. तर २०१८-१९ मध्ये ४९१ आणि २०१७१८ मध्ये ४१२ कोटी रुपयांची डाळिंबाची निर्यात झाली होती.

२०१९-२० मध्ये २३१९ कोटी रुपयांचा कांदा निर्यात झाला. तर २०१८-१८ मध्ये १९१४ आणि २०१७-१८ मध्ये १९७२ कोटी रुपयांचा कांदा निर्यात झाला होता.

### राज्यातून होणारी निर्यात

राज्यातून सध्या आंबा, द्राक्षे, डाळिंब, आंबा पल्प, काजू, संत्री, कांदा, मका, तांदूळ यासह इतर धान्यांची निर्यात होते. त्यासाठी ४४ निर्यात केंद्रे उभारण्यात आली आहेत.

दै: "अॅग्रोवन" दि. ०७/१२/२०२२.

# स्ट्रॉबेरीची ‘जीआय’ नोंदणी करून ‘क्यूआर कोड’चा वापर करावा

## उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले यांचे आवाहन

**अॅग्रोवन वृत्तसेवा**

सातारा : महाबळेश्वर पंचक्रोशीतील स्ट्रॉबेरीचे मार्केटिंग करताना जीआय नोंदणी करून ‘क्यूआर कोड म्हणजेच मार्केटिंग’ असे समजून शेतकऱ्यांनी क्यूआर कोडचा वापर करण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यामुळे ग्राहकांचा विश्वास संपादन करण्याची संधी शेतकऱ्यांना प्राप्त झाली आहे. क्यूआर कोडमुळे ग्राहकांना शेतमालाच्या गुणवत्तेबाबत हमी मिळणार असून, शेतकऱ्यांना अधिकचा दर मिळण्यास मदत होणार असल्याचे महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, कोल्हापूर विभागाचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले यांनी सांगितले.

राज्य कृषी पणन मंडळ, कोल्हापूर आणि श्रीराम फळ प्रक्रिया सहकारी संस्था मर्यादित. भिलार यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीराम दूध डेअरी सभागृह भिलार येथे शेतीमालाच्या गुणवत्तेसाठी क्यूआर कोडच्या वापराबाबत



शुक्रवारी (ता. ३) कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्या वेळी ते बोलत होते.

डॉ. घुले म्हणाले, “स्ट्रॉबेरी उत्पादक शेतकऱ्यांनी जीआय मानांकन नोंदणी करून निर्यात वाढवावी. क्यूआर कोडमुळे ग्राहकांना स्ट्रॉबेरी उत्पादना संदर्भातील उत्पादकाचे नाव, पत्ता, संपर्क क्रमांक, उत्पादनाविषयी सविस्तर माहिती, भौगोलिक ठिकाण, उत्पादन काढल्याचे दिनांक, पॅकिंग केल्याचे दिनांक आदी बाबतची माहिती प्राप्त होणार आहे. क्यूआर कोडच्या वापरामुळे शेतकरी मार्केटिंगसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन डिजिटलायझेशनच्या युगामध्ये प्रवेश करणार आहेत.”

दै. "ॲग्रोवन" दि. ६।१२।२१.

# 'किसान रेल्वे'तून ३४५ टन कांदा पश्चिम बंगालकडे रवाना

## नांदेड विभागातून किसान रेल्वेची ४००वी फेरी

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

नांदेड : नांदेड रेल्वे विभागातील नगरसोल येथून ४००वी किसान रेल्वे ३४५ टन कांदा घेऊन पश्चिम बंगाल येथील चितपूर येथे शुक्रवारी (ता. २४) रवाना झाली. नांदेड रेल्वे विभागातून या वर्षी ५ जानेवारी २०२१ रोजी सुरू केलेल्या किसान रेल्वेने मोठा पल्ला गाठला आहे. ४००व्या किसान रेल्वेने नांदेड विभागातून देशाच्या विविध भागांत कांदा, द्राक्षे, टोमॅटो आणि टरबूज पोहोचविले आहेत. नांदेड रेल्वे विभागास ५७.६४ कोटी रुपयांचा महसूल प्राप्त झाला आहे.

किसान रेल्वेने वाहतूक केल्यामुळे वाहतूक दरात पन्नास सूट देण्यात येते. अनेक शेतकरी, व्यापारी याचा लाभ घेत आहेत. ४०० फेऱ्या किसान रेल्वेने केल्याबद्दल नांदेड विभागीय रेल्वे व्यवस्थापक उपिंदर सिंग यांनी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. किसान रेल्वेमधून आजपर्यंत १.२५ लाख टन कांदा, टरबूज, टोमाटे आणि द्राक्षांची वाहतूक झाली आहे. हा शेतीमाल देशातील विविध भागांत जसे न्यू गुवाहाटी, नावगाचिया, डानकुनी, मालडा टाऊन, गौर माल्दा, अगरतला, फातुहा, न्यू जलपैगुडी इत्यादी ठिकाणी पोहोचविण्यात आला आहे. त्यामुळे कांदा, टरबूज, टोमॅटो आणि द्राक्षे उत्पन्न करणारे शेतकरी किसान रेल्वेचा लाभ घेत येत आहेत. नांदेड रेल्वे विभागातील इतर ठिकाणांहून सुद्धा किसान रेल्वे सुरू करण्याकरिता संबंधित बी.डी.यू. टीममधील अधिकारी प्रयत्न करत आहेत. मालवाहतूक भाड्यात पन्नास टक्के सूट मिळत आहे. याचा इतर ठिकाणातील शेतकरी, व्यापाऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन उपिंदर सिंग यांनी केले आहे.

### किसान रेल्वेची वैशिष्ट्ये

कृषी क्षेत्राच्या मार्केटिंगकरिता अडचणी मुक्त, सुरक्षित व जलद वाहतूक सेवा उपलब्ध करून देताना कृषी क्षेत्राचे उत्पन्न वाढविण्यासाठी किसान रेल चालवण्याची संकल्पना भारत सरकारने सुरू केली आहे. किसान रेल्वे या गाड्या निश्चित वेळापत्रकानुसार धावतात, साधारण ५० किलोमीटर प्रति तास या वेगाने धावतात. त्यामुळे शेतीमाल वेळेवर पोहोचतो. शेतकऱ्यांना चांगली बाजारपेठ उपलब्ध होते. शेतकऱ्यांना आणखी प्रोत्साहित करण्यासाठी अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाने ऑपरेशन ग्रीन्स टॉप टू टोटलच्या अंतर्गत किसान रेल गाड्यांद्वारे अधिसूचित फळे आणि भाजीपाल्यांच्या वाहतुकीवर पन्नास टक्के वाहतूक दर सवलत देण्याची घोषणा केली आहे.

दै. "केसरी" दि. १/१२/२०२१.

# महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळातर्फे योजना

भौगोलिक चिन्हांकन/मानांकन प्राप्त उत्पादकांच्या अधिक उत्पादनांसाठी तसेच या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्याच्या दृष्टीने राज्यामध्ये कृषि विभागातर्फे आणि महाराष्ट्र कृषि स्पर्धात्मक प्रकल्प या अंतर्गत एकूण २४ कृषी उत्पादनांना भौगोलिक चिन्हांकन/मानांकन प्राप्त झाले आहे. या एकूण २४ कृषी उत्पादनांकरिता राज्यामध्ये २७ उत्पादकांच्या संस्था कामकाज करीत आहेत.

मानांकनाबाबत माहिती करुन देणे यामुळे होणारे फायदे, उत्पादनासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती, उत्पादनाची प्रत, पॅकिंग, वापरावयाचा लोगो व या सर्वांकरिता नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त संस्था यांचेकडे आवश्यक मनुष्यबळ आणि आर्थिक परिस्थिती नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे भौगोलिक चिन्हांकन/मानांकन संदर्भातून प्रचार प्रसिद्धी करणे, त्या कृषीमालाच्या उत्पादकांच्या संस्थेकडे शेतकऱ्यांची, निर्यातदारांची, प्रक्रियादारांची नोंदणी करणे, तसेच त्यांचे कृषीमालाची बाजारसाखळी विकसित करणे यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत योजना राबविणे प्रस्तावित होते.

भौगोलिक चिन्हांकन/मानांकन बाबतची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे, शेतकऱ्यांची नोंदणी करणे, तसेच या शेतमालाची विक्री व्यवस्था/निर्यात याबाबत कामकाज करण्याची गरज आहे. त्याकरिता नोंदणी करावयाच्या संस्था आणि कृषी पणन मंडळ सदरील कामकाज करेल. त्यासाठी भौगोलिक चिन्हांकन/मानांकन प्राप्त उत्पादनाचे प्रचार, प्रसिद्धी, नोंदणी व बाजारसाखळी विकसित करणे, यासाठी ४ स्वतंत्र योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.